# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 02/09/2023 (शनिवार) सायंकाळ

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कुही** :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अप. क्र. १०६/२०१७ कलम ३७६(२)(आय) भादवि सहकलम ४, ५, ६, ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी व विधीसंघर्षग्रस्त बालक हे एकमेकांच्या घराशेजारी राहत असुन यातील विधीसंघर्षग्रस्त बालक याने फिर्यादीच्या अल्पवयीन पिडीत मुलीला स्वत: चे घरी घेवुन गेला व मुलीशी जबरी संभोग केला.

सदर प्रकरणाचे तपास पोनि. काळे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे १ झपाटे सो. कोर्टामध्ये सादर केले. दिनांक ०२/०९/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश मा. डी. जे १ झपाटे सो. यांनी सदर गुन्हयातील आरोपीला कलम ३७६(२) (आय) भादंवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व २०,०००/—रू दंड. दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास. अशी शिक्षा ठोठावली आहे. दंडातल्या रक्कमेमधील पिडीतेला १९,०००/— रु. देण्याचे आदेश दिले आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. नायर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा/११५१ दिलीप लांजेवार पो.स्टे कुही यांनी मदत केली आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत उमरेड ते गिरड मौजा सिल्लेपार फाटा येथे दिनांक ३१/०८/२०२३ चे १९.१५ वा. ते १९.३० वा. सुमारास फिर्यादी व मृतक व जखमी यांच्यासह ए. के प्लास्टीक कंपनी उमरेड येथुन डयुटी संपल्यावर त्याच्या मोटरसायकल क्र. एम. एच.— ४०/सी जे.—८९५६ होन्डा शाईन यावर ट्रिपल सीट बसुन बेसुर येथून जात असताना सिल्लेपार फाटा जवळ वळण नागमोडी रस्ता असल्याने गाडीची स्पीड कमी केली असता मागुन येणारी मोपेड क्र. एम एच.—४०/बीटी.— ५२५७ हिला मागुन अज्ञात ट्रकने धडक दिल्याने ति मोपेड गाडी फिर्यादीच्या मोटरसायकलला धडकली तेवढयात त्या ट्रकने फिर्यादीच्या मोटरसायकलला धडक दिल्याने फिर्यादी व त्याचे सोबत असलेले त्याचे मित्र मृतक नामे— लकी चिंतामन अडसकर वय २८ वर्ष, रा. बेसुर ता भिवापूर तसेच रितेश गणेश श्रिवास वय १८ वर्ष रा बेसुर ता भिवापूर हा मेडीकल कॉलेज नागपूर येथे उपचारा दरम्यान मृत पावला तसेच ईतर जखमी नामे १) गणेश दिलीप तांदुळकर वय २४ वर्ष २) सौरभ अमृत चौधरी वय २५ वर्ष ३) मयुर अमृत चौधरी वय २१ वर्ष ४) गोपीचंद रामदास देवगडे वय २९ वर्ष सर्व रा. बेसुर ता. भिवापूर यांना जखमी होण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गोपीचंद रामभाउजी देवगडे, वय २८ वर्ष रा बेसुरता भिवापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १३४/१७७, १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविन्द्र वाडा पोस्टे उमरेड मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर बस स्टॉप सावनेर येथे दिनांक ३१/०८/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान यातील मृतक हा बसस्टॉप सावनेरचे समोर उभे असता एक पांढऱ्या रंगाची स्कॉर्पीओ कार क्र एम एच ३०/एल ९४०२ चा चालक ने आपली गाडी बसस्टॉप सावनेरचे आतुन येवुन फिर्यादीचे वडीलास मागुन येवुन धडक देवुन अपघात केला व कारसह पळुन गेला यामुळे त्याचे डोक्याला मार लागल्याने त्यांना ग्रामिण रूग्णालय सावनेर येथे उपचाराकरीता नेले असता तेथिल डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. फिर्यादीचे वडीलाच्या मृत्युला पांढऱ्या रंगाची स्कॉर्पीओ कार क्र एम एच ३०एल ९४०२ चा चालकाने आपले ताब्यातील वाहन भरदाव वेगाने व निष्काळजिपणे चालवुन फिर्यादीचे वडील नामे –दिलीप हरीचद कानफाडे वय ६५ वर्ष याचे मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नंदकिशोर दिलीप कानफाडे, वय ३३ वर्ष, रा. पटकाखेडी ता. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादंवि सहकलम १३४/१७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा खोडनकर ब. नं. १७९१ मो. नं. ९५५२५५७७६० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**